काही संघर्ष उदभवणार आहेत ते त्यांनी स्विकारलेले राजकीय आदर्शामुळे किंवा राजकीय प्रणालीमधून नसून जे संघर्ष उद्भवतील त्यामागील मूळ कारण हे संस्कृती असणार आहे.''[1] शीतयुध्द हे दोन राजकीय प्रणालींमध्ये होत असते. आजच्या घडीला भांडवलशाही पाश्चिमात्य समाज आणि साम्यवादी यांच्यामध्ये हा संघर्ष झडत आहे. या दोन राजकीय पध्दतीत मुलत: तात्त्विक भेद आहे. भांडवलशाही समाजात स्वातंत्र्य, लोकशाही व लोकांचा सहभाग इ. मूल्यांना आत्यंतिक महत्त्व असते. तर साम्यवादी समाजात स्वातंत्र्य, लोकसहभाग समता व सर्वांची मालकी इ. मूल्यांना महत्त्व असते. या मुलभूत तत्त्वांना अनुसरुनच अमेरिका व रशिया सारख्या दोन बलाढ्य शक्तींमध्ये शीतयुध्द काळातील संघर्ष चालूच आहे. मात्र या दोन महाशक्तींमधील संघर्षाची तीव्रता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, परिणामत: हंटिग्टनचे म्हणण्यानुसार आधुनिक काळात जो संघर्ष पाहायला मिळत आहे किंवा मिळणार आहे दोन किंवा अधिक संस्कृत्यांमधील असेल.

**हंटिग्टने उल्लेख केलेल्या संस्कृती खालीलप्रमाणे होत.**

1) पाश्चात्य (वेस्टर्न) 2) लॅटिन अमेरिकन 3) इस्लामिक 4) सिनिक 5) हिंदु 6) पारंपारिक(सनातनी)

7) जापनीज 8) आफ्रिकन

**सांस्कृतिक ओळख व भिन्नता:**

हंटिग्टनचे मते, सांस्कृतिक संस्था या तात्कालिन समाजातील महत्त्वाचे घटक आहेत. आज आर्थिक सहकार्यामुळे सांस्कृतिक घटकांना महत्त्व दिले जात आहे. तर काही देश सांस्कृतिक दृष्ट्या जवळचे वाटतात. सांस्कृतिक दृष्ट्या जवळचे वाटणा-या देशांना श्रीमंत देश आर्थिक सहकार्य करण्याला प्राधान्य देत आहेत. '' आज जागतिक पातळीवर सांस्कृतिक ओळख व सांस्कृतिक अभिन्नतेला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.'' [2] आजपर्यंत पाश्चात्य संस्कृती ही संपूर्ण जगात आपली अधिकारशाही टिकवून होती. परंतु भविष्यकाळात या पाश्चात्यांच्या अधिकारशाहीला सांस्कृतिक ऐक्य हे आव्हान बनणार आहे असे भाकीत हंटिग्टन यांनी केले आहे. हंटिग्टन यांचे मते भविष्यात पाश्चात्यांना आपले वर्चस्व टिकवायचे असेल तर संस्कृतीतील ताण समजून घेऊन त्याप्रमाणे उपाययोजना त्यांना आखाव्या लागतील.

शीतयुध्दाचा ज्वर आता जवळपास ओसरला आहे. शीतयुध्दाच्या नंतरच्या काळातील जगाच्या राजकारणात अनेक फेरबदल झालेत. यात देशाच्या सीमांचे स्वरुप हे भौगोलिक न राहता त्याला संस्कृतीचे एक वेगळे वलय लाभले आहे. हंटिग्टनच्या मतानुसार, जगाच्या राजकारणात आपले वर्चस्व टिकवायचे असेल तर देशांनी बहुसांस्कृतिकतेच्या टिकावाची खबरदारी घेणे आवश्यक आहे. पाश्चात्य देशांनी स्वत:ला लोकशाहीचे समर्थक व प्रचारकाच्या भूमिकेतून पाहिले आणि ज्या राष्ट्रात लोकशाही नाही, त्यांना आपले शत्रू मानून तेथे लोकशाही यावी यासाठी प्रयत्न केले. लोकशाहीचे सामान्यीकरण व सार्वत्रिकरण करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी प्रयत्न केले. दुस-या देशांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. सैन्याच्या बळाचा वापरही त्यासाठी केला गेला. अमेरिकेच्या पुढाकाराने साम्यवादी देशांच्या विरोधात कारवायाही करण्यात आल्या. हे सर्व करून झाल्यानंतर आज ज्या ज्या

देशांत पाश्चात्यांच्या मदतीने लोकशाही अवतरली ते देशही हे सर्व विसरुन सांस्कृतिक दृष्ट्या भिन्न ठरणा-या अमेरिकेचे शत्रू बनत आहेत.

**हंटिंग्टनकृत सांस्कृतिक संघर्षाची कारणमिमांसा :**

हंटिंग्टन यांनी सांस्कृतिक संघर्षामागील कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे. या कारणांच्या समर्थनार्थ हंटिंग्टन म्हणतो, सांस्कृतिक अभिन्नता किंवा सारखेपणामुळे हे देश जोडले जातात. ज्या देशातील लोकांशी साधर्म्य असणारे वातावरण असेल ते देश त्यांना आपले वाटतात. त्यांच्याकडून आपणास कोणताही धोका नाही असे त्यांना वाटत असते. तर आपल्या देशातील संस्कृतीशी भिन्न संस्कृती असणारे देश त्यांना धोकादायक वाटतात. त्यांच्याविषयी त्यांच्या मनात काही पूर्वग्रह निर्माण होतात. पूर्वग्रहाचे रुपांतर वैमनस्यात होऊ शकते. तर कधी कधी अशा देशांची गणना ते शत्रू पक्षात करतात. हंटिंग्टनच्या मते, ‘’ या जगात जगातील भविष्यातील संघर्ष हे वैचारिक आदर्श प्रणाली किंवा राजकीय आदर्श तत्त्वानुसार न होता त्यामागील प्रमुख घटक हा सांस्कृतिक असणार आहे .’’[3]

**सहिष्णूता व सहिष्णुतेचे महत्त्व :**

‘’सॅम्युअल गोलवीन यांच्या मतानुसार जीवन जगण्याच्या कलेचा 90% भाग हा ज्या लोकांशी आपले जमत नाही त्यांच्याशी जुळवून घेण्याचा आहे.’’[4] आजच्या आधुनिक समाजाला अनुसरून वरील विधानाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. ‘’सहिष्णुता म्हणजे आपल्यापेक्षा भिन्न मते, विचार, दृष्टीकोन असणा-या व्यक्तींच्या मतांचा, विचारांचा आदर करणे, प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य व कृतीचे स्वातंत्र्य बहाल करणे होय.’’[5] विविध पंथाचे, विविध धर्माचे, विविध संस्कृतीचे, विविध देशाचे लोक जेव्हा एकत्रितपणे एका समाजात किंवा देशात गुण्यागोविंदाने राहताना आढळतात तेव्हा त्यांच्यात सहिष्णूता उत्पन्न होते. त्यांच्यात सहिष्णुता असेल तरच त्यांच्यात जातीय दंगली, धार्मिक दंगली किंवा सांप्रदायिक ताणतणाव कमी प्रमाणात आढळतात. ‘जगा आणि इतरांनाही शांततेने जगू द्या’ या तत्त्वांचे पालन करण्यास सहिष्णूता प्रेरित करते. समाजातील सर्व लोकांनी शांततेने आणि एकोपेच्या भावनेने रहावे, त्यांनी एकमेकांच्या मतांचा आदर करावा, त्याच्या मध्ये न्यायाची, बंधुत्वाची आणि समानतेची भावना व विश्वास निर्माण होण्यासाठी सहिष्णुता अतिशय महत्त्वाची असते. सहिष्णूता असणारे लोक कधीही, जातीय, धार्मिक, वांशिक, प्रांतिक किंवा भाषिक भेदभाव करत नाहीत. परस्पर मतांचा, मतातील विभिन्नतेचा, सांस्कृतिक विभिन्नतेचा आदर करतात. सहिष्णुता लोकांना शांततेने व ऐक्याच्या भावनेने राहण्यास प्रवृत्त करते. सहिष्णु वातावरणात समाजाचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. शांतता आणि जातीय सलोख्याचे संबंध कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी महत्त्वाची अट आहे

**सारांश :**

या शोध निबंधाचा सारांश असा सांगता येईल की, आजच्या आधुनिक समाजात विविध जातीचे, धर्माचे, पंथाचे, वंशाचे, देशाचे

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

लोक एकत्रितपणे राहताना आढळतात. अनेकांना अनेक देशाच्या सीमा खुल्या होऊन इच्छित देशाचे नागरिकत्त्व प्राप्त होत आहे. ज्ञानेश्वरांच्या पसायदानाप्रमाणे ‘हे विश्वची माझे घर’, अशी स्थिती निर्माण झाली आहे. असे असले तरी प्रत्येक व्यक्ती, धर्म, समाज, वंश व देशाची संस्कृती वेगळी आहे. सांस्कृतिक विभिन्नता हे आजच्या आधुनिक समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. बहुसांस्कृतिकतेमुळे संघर्ष, ताणतणाव निर्माण होऊ शकतात. मात्र हे संघर्ष पराकोटीला न जाता त्यांच्यात सहिष्णूतेचे वातावरण तयार करण्याचे कार्य केंद्रिय सत्तेला करावे लागेल. त्यात परस्पर मतांचा आदर करुन परस्परांशी नैतिक मूल्याधारित संबंध विकसित करण्याला महत्त्व देऊन त्याआधारिक शैक्षणिक अभ्यासक्रमांची निर्मिती व शिकवण द्यावी लागेल. तरच बहुसांस्कृतिक समाजातील सर्व लोक गुण्यागोविंदाने व शांततेने जीवन व्यापन करतील. सहिष्णूतेमुळे समाजात शांतता व एकोपा टिकून राहू शकतो. याच कारणास्तव आज बहुसांस्कृतिक समाजातील एकात्मतेवर उपाय म्हणून सहिष्णूता हाच एकमेव उपाय ठरावा.

**संदर्भ :**


- Short History of Western Civilization, John B. Harrison and Richard E. Sulivan.
- Identity crisis of Muslim: Shriniwasan Nirmala.
- The clash of Civilization and remaking of world order, Samual Hantington, oxford University press, London.
- Rethinking Multiculturalism; cultural and Political Theory, Bheeku Parikh.
- Secularism and Constitution of India, P.G. Gajendragadkar, University of Bombay, 1971.


**Cite This Article:**

***डॉ. रेखा मारोतराव शेरकर, (2022***) सॅम्युअल हंटिंग्टन यांना अनुसरून बहुसांस्कृतिक संघर्षाचा अन्वयार्थ व सहिष्णूतेचे महत्त्व, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 21-24.*